SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
Colleges & University Development Section
PHONE : EPABX – (0231) 2609000, 2609145
FAX : 0091-0231-2691533, 2692333, 2693294
Website : www.unishivaji.ac.in E-mail : stats@unishivaji.ac.in

Estd. - 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० , २६०९१४५ (महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९२३३३, २६९३२९४.

जा.क्र. मविविवि/युजीके/ 109 दिनांक :- - 8 MAY 2019

प्रति,
अधिविभागप्रमुख /समन्वयक/संचालक,
सर्व अधिविभाग/ केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- शिष्यवृत्तीधारक संशोधक विद्यार्थ्यांची सातत्य प्रमाणपत्र, घरभाडे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे वित्तीय संस्थेच्या संकेतस्थळावर नोंदविण्यासाठी वेळेत सादर करण्याबाबत.

संदर्भ :- १) जा.क्र. एस.यु./म.वि.वि.विभाग/८७२ दि. १९/११/२०१८ चे या कार्यालयाचे पत्र.
२) जा.क्र. एस.यु./म.वि.वि.विभाग/९०८ दि. ३०/११/२०१८ चे या कार्यालयाचे पत्र.

महोदय/महोदया,

विविध वित्तीय संस्थेकडून संशोधक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/अधिछात्रवृत्ती मंजूर होत असते. या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असणारी सातत्य व घरभाडे प्रमाणपत्रे इ. कागदपत्रे ही संबंधित संशोधक विद्यार्थ्याचे मार्गदर्शक व संबंधित अधिविभागाचे प्रमुख यांच्या मान्यतेसह म.वि.वि. विभागाकडे पाठवली जातात. या विभागाकडून ती वित्तीय संस्थेच्या संकेतस्थळावर नोंदवल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीची रक्कम परस्पर त्याच्या बँक खात्यामध्ये जमा होते.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १०/१०/२०१८ च्या परिपत्रकानुसार संशोधक विद्यार्थ्यांनी सदरची कागदपत्रे प्रत्येक महिन्याला नोंदवणे अनिवार्य असल्याचे कळिवले आहे. त्यानुसार संदर्भीय क्र. २ च्या पत्रान्वये, जानेवारी, २०१९ पासून सर्व संशोधक विद्यार्थ्यांची सातत्य व घरभाडे प्रमाणपत्रे इ. कागदपत्रे वित्तीय संस्थेने दिलेल्या विहित नमुन्यामध्ये भरून अधिविभागप्रमुखांच्या मान्यतेसह प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी म.वि.वि. विभागात सादर करावीत असे कळविले आहे.

**वित्तीय संस्थेच्या संकेतस्थळावर कागदपत्रे नोंद करण्यासाठी Slot दिला जातो. तो एक महिन्यानंतर बंद होतो. काही अधिविभागाकडून संशोधक विद्यार्थ्यांची कागदपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर केली जात नाहीत. त्यामुळे ती वेळेत संकेतस्थळावर नोंदवली जात नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच संकेतस्थळावर Pending from University असा शेरा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दिसून येतो.**

या संदर्भात मा. कुलगुरू यांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविणेत येते की, आपल्या अधिविभागामध्ये वित्तीय संस्थेकडून शिष्यवृत्ती घेत असलेल्या संशोधक विद्यार्थ्यांची सातत्य व घरभाडे प्रमाणपत्रे इ. कागदपत्रे आपल्या मान्यतेसह प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत म.वि.वि. विभागास सादर करावीत. जेणेकरून आयोगाने सुचित केलेनुसार संशोधक विद्यार्थ्यांना त्यांची शिष्यवृत्ती वेळेत मिळण्यास मदत होईल.

तसेच संशोधक विद्यार्थ्यांची कागदपत्रे १० तारखेपर्यंत सादर न केलेस व संबंधित विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त न झालेस होणाऱ्या नुकसानीस प्रशासन जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

प्रकुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.